महाराष्ट्र शासन

जिल्हाधिकारी कार्यालय, बुलढाणा (सामान्य निर्वाचन विभाग)

| | |
|---|---|
| E-mail : dydeobuldhana@gmail.com | दुरध्वनी क्रमांक : ०७२६२ - २४३११६ |
| क्रमांक कावि/अ.का.-१/सा.नि./कक्ष-१४/ २४ /२०२६ | दिनांक :- १० /०२/२०२६ |

पीडीएफ/सॉफ्ट कॉपीवरून संभाव्य विशेष पुनरिक्षण कार्यक्रम (SIR) साठी आवश्यक नमुने व इतर अनुषंगीक आवश्यक बाबींची छपाई करणेबाबत

## ई - निविदा सुचना क्रमांक १/२०२६

बुलडाणा जिल्हयातील ०७ विधानसभा मतदार संघाकरीता पीडीएफ/सॉफ्ट कॉपीवरून संभाव्य विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम (SIR) साठी आवश्यक नमुने व इतर अनुषंगीक आवश्यक बाबींची छपाई करून जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, आदेश देतील त्या ठिकाणी पुरवठा करणेसाठी अनुभवी व सुयोग्य अभिकर्त्याकडून विहित नमुन्यातील निविदा ई- निविदा प्रणालीद्वारे मार्गावण्यात येत आहे. सदर ई- निविदा www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर प्रसिध्द करणेत येत आहे.

कामाचे नांव : बुलडाणा जिल्हयातील ०७ विधानसभा मतदार संघाकरीता पीडीएफ/सॉफ्ट कॉपीवरून संभाव्य विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम (SIR) साठी आवश्यक नमुने व इतर अनुषंगीक आवश्यक बाबींची छपाई

| | |
|---|---|
| निविदा अंदाजीत रक्कम | रू. ३५,००,०००/- |
| ई निविदा फार्म शुल्क | रू. ५७००/- (विना परतावा) |
| इसारा / बयाणा (EMD) रक्कम | रू. ९५,०००/- |
| सुरक्षा अनामत रक्कम | रू. २,००,०००/- |
| ई - निविदा प्रसिध्दीचा दिनांक व वेळ | दि. १० /०२/२०२६ सकाळी ११.०० वाजता |
| ई - निविदा भरण्याचा कालावधी | दि. १० /०२/२०२६ सकाळी ११.०० पासून ते दि. २४ /०२/२०२६ सायंकाळी ०५.०० पर्यंत |
| निविदा पूर्व बैठक (Prebid Meeting) दिनांक वेळ | दि. १३ /०२/२०२६ दुपारी १२.०० वाजता |
| ई - निविदा स्विकृतीचा अंतिम दिनांक व वेळ | दि. २४ /०२/२०२६ सायंकाळी ०५.०० वाजता |
| ई - निविदा फार्म क्रमांक -१ (तांत्रिक लिफाफा) उघडणेचा दिनांक व वेळ | दि. २५ /०२/२०२६ रोजी दुपारी ०३.३० वाजता किंवा तद्नंतर |
| ई - निविदा उघडण्याचे ठिकाण | उपजिल्हा निवडणूक अधिकारी यांचे कार्यालय बुलढाणा |
| संपर्क अधिकारी | उपजिल्हा निवडणूक अधिकारी बुलढाणा |

**निविदा भरताना सर्वसाधारण आवश्यक बाबी :**

१. सदर निविदेच्या अटी व शर्ती www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहेत. निविदा फी व इसारा रक्कम www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावरुन ऑनलाईन भरुन त्याची पावती स्कॅन करुन अपलोड करावी. (तांत्रिक निविदेतनमूद केलेली कागदपत्रे PDF मध्ये तयार करुन Briefcase I मध्ये अपलोड करावीत).

जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी बुलढाणा

Scanned with OKEN Scanner

२. प्राप्त निविदा कारणे न देता नाकारणे अथवा स्विकारण्याचे अधिकार जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक बुलढाणा यांनी स्वतः राखून ठेवले आहे. तसेच निविदा अटी व शर्ती अर्जासोबत उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत.

३. सदरची निविदा काम प्राप्त करून देण्याची कोणतीही हमी देत नाही.

४. ई निविदेत भाग घेण्यासाठी निविदाकारानी क्लास III डीजीटल सिग्नेचर व वर नमूद केलेल्या संकेतस्थळावर स्वतः नाव नोंदणी करुन घ्यावी.

५. सदर अटी व शर्तीनुसार नमूद केलेली कागदपत्रे, निविदा खरेदीची पावती ई-निविदेत स्कॅन करुन PDF फॉर्ममध्ये सादर करणे आवश्यक आहे. उपरोक्त कागदपत्रे सादर करणेस कोणतीही वाढीव मुदत अथवा सवलत दिली जाणार नाही.निविदाधारकाने निविदा पूर्व बैठक (Prebid Meeting) ला उपस्थित राहणे आवश्यक आहे. निविदेबाबतची पुर्व बैठक उपरोक्त नमुद दिवशी उपजिल्हा निवडणूक अधिकारी बुलढाणा यांचे दालनात राहील.

जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी बुलढाणा

डॉ. किरण पाटील (भा.प्र.से.)
जिल्हाधिकारी बुलढाणा तथा
जिल्हा निवडणूक अधिकारी, बुलढाणा

Scanned with OKEN Scanner

## ब) निविदेतील इतर अटी व शर्ती

१. वरील कामाची संपूर्ण माहिती www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असून दिनांक /०२/२०२६ रोजी पासून निविदा भरता येतील.

२. उपरोक्त कागदपत्रे सादर करण्यास कोणतेही वाढीव मुदत अथवा सवलत दिली जाणार नाही.

३. लिफाफा क्र. ०१ ची तपासणी केल्यांनतर पात्र कंत्राटदार (निविदाधारक) यांचा लिफाफा क्र. ०२ उघडण्यात येईल.

४. ठेकेदारास कोणत्याही प्रकारचे अग्रीम (ॲडव्हान्स) दिला जाणार नाही.

५. निविदाधारकाने सादर केलेले देयकाची प्रतिपुर्ती अनुदान उपलब्धतेनुसार करण्यात येईल. त्याबाबत झालेल्या विलंबामुळे कोणत्याही प्रकारचे व्याज देय होणार नाही किंवा निविदाधारकास कोणत्याही न्यायालयात याबाबत दावा दाखल करता येणार नाही.

६. निविदाधारकांच्या देयकातून नियमानुसार आयकर व इतर शासकिय कर कपात करण्यात येईल.

७. कोणत्याही अटीच्या अर्थाबद्दल किंवा इतर कोणत्याही बाबतीत विवाद उद्भवल्यास जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी बुलढाणा यांचा निर्णय अंतिम व बंधनकारक राहील. तसेच निविदा संदर्भातील कोणत्याही प्रकारचा कायदेशीर वाद / न्यायालयीन वाद उद्भवल्यास मा. जिल्हा न्यायालय, बुलढाणा च्या कार्यकक्षेमध्ये चालवण्यात येईल.

८. निविदाधारकाने दर नमुद करताना वस्तू व सेवासाठीची किंमत खर्च व त्यासाठी भरावे लागणारे वेगवेगळे कर, वाहतूक खर्च हे स्वतंत्रपणे नमूद करुन त्याची एकूण होणारी रक्कम नमूद करावी. यशस्वी निविदाधारकास या कार्यालयाकडून कर माफी संदर्भातील कोणतेही प्रमाणपत्र देण्यात येणार नाही. ते नियमानुसार आयकर व लागू असणारे इतर कर वजा करून देयक अदा करण्यात येईल,

९. सदरची निविदा अगर निविदेतील कोणताही भाग तसेच कोणत्याही अटी व शर्ती मध्ये कोणतीही कारणे न देता व कोणतीही पूर्व सुचना न देता रद्द करण्याचा राखून ठेवणेचा तसेच सुधारणा करणेचा हक्क जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, बुलढाणा यांनी स्वतःकडे राखून ठेवला आहे.

१०. ई निविदा संदर्भात केंद्र व राज्य शासनाद्वारे व निवडणूक आयोग यांचेकडून वेळोवेळी निर्गमित होणारे आदेश, परिपत्रकमध्ये निर्देशित केलेल्या सर्व अटी व शर्ती व नियम लागू राहतील.

११. प्राप्त निविदा स्विकारणे अथवा नामंजूर करणे, आवश्यक वाटल्यास काम विभागून देणे अथवा उपरोक्त अटी व शर्तीमध्ये बदल करण्याबाबतचा सर्व अधिकार जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, बुलढाणा यांनी राखून ठेवला आहे.

१२. निविदेतील नमूद झेरॉक्स प्रती व इतर अनुषंगिक साहित्याच्या पुरवठ्यात वाढ करणे, कमीकरणे इ. बाबत जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी यांचे सूचनांचे पालन करावे लागेल. याबाबतीत अंतिम निर्णय जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी यांचा राहिल.

१३. निविदा मंजूर झालेल्या निविदाधारकाने विहित कालावधीत काम पूर्ण न केल्यास व त्याचा निवडणूक कामावर परिणाम होवू नये म्हणून अन्य पुरवठादाराकडून काम करून घेण्यात येईल. व अन्य पुरवठादाराकडून करून घेण्याचे आलेल्या कामाचे देयक संबंधित पुरवठादारास अदा करण्यात येईल.जास्तीचे खर्चाच्या फरकाची रक्कम संबंधित निविदाधारकाकडून वसूल करण्यात येईल.

जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी * बुलढाणा *

Scanned with OKEN Scanner

१४. निविदा मंजूर झालेल्या निविदाधारकाने काम करण्यास नकार दिल्यास सदर निविदा अंतिम झालेल्या दराने दुसऱ्या क्रमांकाच्या निविदाधारकास देण्यात येईल व L1 ने सुरूवातीची जमा केलेली अनामत रक्कम सरकार जमा करण्यात येईल व संबंधित निविदाधारकास काळ्या यादीत समाविष्ठ करण्यात येईल.

१५. सदर निविदेचा कालावधी कार्यारंभ आदेशाच्या दिनांकापासून एक वर्षाचा राहिल, आवश्यक वाटल्यास सदरचा कालावधी कमी किंवा जास्त करण्याचा अधिकार जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी यांना असेल.

१६. लेखा परीक्षणातील तपासणीमध्ये तपासणी पथकाने शोधलेल्या मुद्या (Audit Para) अंतर्गत रक्कमेची संपूर्ण वसूली ठेकेदारास देणे बंधनकारक राहील.

१७. निविदाधारक यांना शासकीय / निमशासकीय कामकाजाच्या बाबतीत काळ्या यादीत घोषीत केलेले असल्यास अशा निविदाधारक/संस्था यांनी निविदा भरू नये, असे आढळून आल्यास निविदा विचारात घेतली जाणार नाही किंवा अशा निविदाधारकाचे निविदा मंजूर झालेली असल्यास रद्द करण्यात येईल व तद्नंतर निविदा दर कमी असलेल्या निविदाधारकास निवडणूकीसाठी आवश्यक झेरॉक्स प्रती व इतर अनुषंगिक साहित्य पुरविण्यासाठी निवड करण्यात येईल.

१८. निविदा संबंधातील सर्व सुचना या www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर प्रसिध्द करणेत येईल, याबाबत व्यक्तिगत पूर्व सूचना देणेत येणार नाही याची नोंद घ्यावी.

१९. प्रथम वेळेस निविदेस अल्प प्रतिसाद मिळाल्यास म्हणजेच कमीतकमी ३ ग्राह्य निविदा प्राप्त झाल्या नसल्यास पुन्हा ५ दिवसाकरीता मुदत देणेत येईल. दोन वेळेस मुदतवाढ दिल्यानंतरही प्रतिसाद प्राप्त न झालेस याबाबत अंतिम निर्णय जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी,बुलढाणा हे घेतील व पुढील निविदा प्रक्रीया नियमानुसार पुर्ण केली जाईल.

२०. निविदेमधील सर्व साहित्याचा वाहतूक खर्च ठेकेदाराने करावयाचा आहे..

२१. निविदा मंजूर झालेल्या निविदाधारकाने जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी बुलढाणा यांनी ठरवून दिलेल्या विहित नमुन्यात नियमानुसार अनुज्ञेय असलेल्या रकमेच्या स्टॅम्प पेपरवर करारनामा करणे आवश्यक आहे.

२२. यशस्वी निविदाधारकाला ई-निविदा मंजूर झाल्यानंतर १५ दिवसाच्या आत निविदेच्या अनुज्ञेय किंमतीच्या टक्केवारी नुसार राष्ट्रीयकृत बँकेचा डिमांड ड्राफ्ट कार्यालयात जमा करणे बंधनकारक राहिल. निविदा कालावधी समाप्त झाल्यानंतर नियमानुसार निविदाधारकास सुरक्षा ठेव रक्कम परत केली जाईल.

२३. झेरॉक्स प्रती व इतर अनुषंगिक साहित्य पुरवठा करणेसाठी आवश्यक असणारी यंत्रसामुग्री व मनुष्यबळ निविदाधारकाकडे उपलब्ध असणे आवश्यक आहे.

२४. ज्या निविदेमध्ये निश्चीत दर दिलेले नसतील अथवा दिलेल्या दरांमध्ये संदिग्धता असेल अशी निविदा नाकारली जाण्यास पात्र ठरेल. जर अक्षरी व अंकी दरांमध्ये तफावत आढळल्यास दोन्हीपैकी जो दर कमी असेल तो दर विचारात घेतला जाईल.

२५. निविदेमध्ये नमुद करण्यात येणाऱ्या दरामध्ये प्रत्यक्ष काम करणाऱ्या व्यक्तीच्या शुल्कासहित व सर्व करांसह समाविष्ट असावे, साहित्य ने आण (ट्रान्सपोर्ट) करणेसाठी वेगळे शुल्क दिले जाणार नाही.

२६. निविदाधारकाने कामावर बालकामगार ठेवले जाणार नाही याची दक्षता घ्यावी.

जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी * बुलढाणा *

Scanned with OKEN Scanner

२७. झेरॉक्स प्रती काढणेकरीता वापरणेत येणारा कागद ७५ जीएसएम प्रतीचा असणे आवश्यक आहे व झेरॉक्स प्रती या वाचनिय असाव्यात. सदर झेरॉक्स अस्पष्ट, अंधुक, खराब काढून दिल्या जाणार नाहीत याची कंत्राटदाराने दक्षता घ्यावी. झेरॉक्स अस्पष्ट, अंधुक काढून दिल्या तर त्यांची निविदा रद्द करून इतर कंत्राटदारांकडून झेरॉक्स काढून घेतल्या जातील. व आपली सुरक्षा अनामत रक्कम शासनास जमा केली जाईल.

२८. निविदेतील कोणत्याही अटी अथवा शर्ती मधील संपूर्ण अथवा कोणत्याही भागाचा भंग झाल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित ठेकेदार प्रचलित नियमानुसार कारवाईस पात्र राहील.

२९. विहित मुदतीत काम पुर्ण न केल्यास दर दिवशी रक्कम रुपये ५०००/- दंड आकरण्यात येईल तो सरकारी खजीन्यात भरणा करावा लागेल.

३०. ज्या ठेकेदाराला काम मंजुर करण्यात येईल त्यांना कामाचा आदेश देणेपूर्वी त्यांचेकडून रक्कम रूपये ५००/- रूपयाच्या बॉड पेपरवर अटी व शर्तीसह बंधनपत्र लिहुन घेण्यात येईल. तसेच सुरक्षा अनामत रक्कम रूपये २,००,०००/- (दोन लाख रू.फक्त) चा राष्ट्रीयकृत बँकेचा घनाकर्ष Deputy District Election Officer, Buldhana यांचे नावे देणे आवश्यक आहे.

३१. छपाई केलेल्या कामाची पडताळणी केली जाणार असल्याने पडताळणीच्या वेळी चुकीची/अस्पष्ट/खराब छपाई असलेल्या प्रती पुन्हा विनामुल्य करून दयाव्या लागतील.

३२. छपाई केलेल्या मतदार यादया तसेच वेळोवेळी छपाई केलेली कामे ठेकेदाराने स्वतः स्वखर्चाने वाहतुक करून जिल्हा कार्यालयात पोहचविणे बंधनकारक राहील.

३३. छपाई कामाचे देयक जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, बुलढाणा यांचे नावे सादर करावयाचे असून काम समाधानकारक व बिनचुकरित्या पुर्ण झाल्यानंतर तसेच केलेल्या कामाची पडताळणी केल्यानंतर देयकाची रक्कम अदा केली जाईल.

३४. आवश्यकतेनुसार अटिमध्ये बदल करणे व वेळोवेळी प्राप्त होणारे शासन निर्णयानुसार बदल करण्याचे अधिकार व कोणत्याही सबबीवर निविदा स्विकारणे किंवा नाकारणे, निविदा रद करणे, पुढे ढकलणे याबाबत सर्व अधिकारी जिल्हाधिकारी, बुलढाणा यांनी राखुन ठेवलेले आहे.

३५. निविदेत नमुद केल्याप्रमाणे सर्व करासहीत दर नमुद करावे.

३६. लिफाफा क्र. ०१ ची तपासणी केल्यानंतर पात्र कंत्राटदार यांचा लिफाफा क्र. ०२ BOQ File उघडण्यात येईल.

**III) लिफाफा क्र.२ निविदेचा व्यापारी लिफाफा :-**

१. (व्यापारी लिफाफ्यातील दरतक्ता .xls मध्ये तयार करून www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर Briefcase-II मध्ये अपलोड करावा.)

२. सशर्त निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत.

३. ज्या निविदेत निश्चित दर दिलेले नसतील अथवा दिलेल्या दरांमध्ये संदिग्धता असेल अशी निविदा नाकारली जाण्यास पात्र ठरेल. जर

४. अक्षरी व अंकी दरांमध्ये तफावत असल्यास दोन्हीपैकी जो दर कमी असेल तो दर विचारात घेतला जाईल.

५. निविदा धारकाने दर नमूद करताना वस्तू व सेवा साठी ची किंमत / खर्च व त्यासाठी भरावे लागणारे वेगवेगळे कर, वाहतूक खर्चासह एकूण होणारी रक्कम नमूद करावी.

Scanned with OKEN Scanner

६. निविदाधारकाने सादर केलेले निविदा कार्यारंभ आदेश दिलेल्या दिनांकापासून ०१ वर्षापर्यंत स्वीकृतीस पात्र राहतील.

IV) सुरक्षा अनामत रक्कम (Security Deposit) :-

1. ज्या निविदाधारकाची निविदा मंजूर झाल्यांनतर १५ दिवसाच्या आत निविदेच्या ३% (तीन टक्के) सुरक्षा अनामत रक्कम राष्ट्रीयकृत बँकेच्या धनाकर्षाने भरणे बंधनकारक राहिल. (या रक्कमेवर कोणतेही व्याज दिले जाणार नाही)
2. जर निविदाधारकाने निविदा स्वीकृतीच्या दिनांकापासून १५ दिवसाचे आत सुरक्षा अनामत रकमेचा भरणा केला नाही तर त्याची निविदा रद्द करण्यात येऊन त्यांचे निविदेसोबत भरणा केलेली बयाणा रक्कम जप्त करण्यात येईल.

V) करारनामा (Agreement) :-

मंजूर निविदाधारकास जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी बुलढाणा यांचेसोबत नियमानुसार अनुज्ञेय रकमेच्या स्टॅम्प पेपरवर करारनामा करून द्यावा लागेल. करारनाम्यामध्ये वरील अटी / शर्तीचा समावेश राहील. तथापि, करारनामा करतेवेळी या अटीमध्ये कोणताही बदल करण्याचा अधिकार जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी बुलढाणा यांनी राखून ठेवला आहे.

जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी बुलढाणा

(डॉ.किरण पाटील भा. प्र. से.)
जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक,
अधिकारी बुलढाणा

Scanned with OKEN Scanner

# दराचा लिफाफा क्रमांक 2 (व्यावसायिक लिफाफा)

| अ.क्र | छपाईबाबतचा तपशिल | सर्व कर, वाहतुक खर्च इ.सह (दर रूपये) |
|---|---|---|
| 01. | छपाई A4 साईज पेपरवर (एका बाजुने) | |
| 02. | छपाई A4 साईज पेपरवर (दोन्ही बाजुने) | |
| 03. | छपाई लीगल साईज पेपरवर (Legel Size) (एका बाजुने) | |
| 04. | छपाई लीगल साईज पेपरवर (Legel Size) ( दोन्ही बाजुने) | |

(उपरोक्त नमुद करण्यात येणाऱ्या दरामध्ये प्रत्यक्ष काम करणाऱ्या व्यक्तीच्या शुल्कासहित सर्व शुल्क (जीएसटीसह) समाविष्ट असावे.साहित्य ने -आण (ट्रान्सपोर्ट) करणेसाठी वेगळे शुल्क दिले जाणार नाहीत.) निविदेअंती सदर दरामध्ये बदल करण्यात येणार नाही याची नोंद घेवून त्याबाबतचे दर नमुद करावे.

ठिकाण :- ------

दिनांक : / /2026.

निविदाधारकाची सही :- -------------------------------

निविदाधारकाची संपूर्ण नाव :- ------------------------------

फर्म / संस्थेचे नाव व पत्ता :- ----------------------------

मोबाईल नंबर

Scanned with OKEN Scanner

## ANNEXURE (B)

**Self-Declarations**

**(Printed on Letterhead, scanned and to be uploaded)**

Declaration as regards acceptance of terms and conditions of contract

1. I ........................................................................................................................ son/daughter/wife of Shri.............................................................................Propriter/Director/authoreised signatory of the company/Firm/Agency mentioned above,is competent to sign this declaration and execute this tender document.
2. I have carefully read and understood all the terms and conditions of the tender and undertake to abide by them.
3. The information/documents furnished along with the tender are true and authentic to the best of my knowledge and belief.I/We am/are well aware of the fact that furnishing of any false information/fabricated document would lead to rejection of my tender at any stage besides liabilities towards prosecution under the appropriate law.

Your's faithfully,

(Signature of the authorized person)

**Place**

**Date**

**Name:**...........................................................

**Designation**...................................................

**Business Address**........................................

..............................................................................

..............................................................................

**Seal**

---

**(Head Procurement)** **(Registrar)** **(Finacial Advisor)**

Scanned with OKEN Scanner

प्रपत्र – 1

मागील तीन वर्षाचे सरासरी उलाढाल प्रमाणपत्र (सनदी लेखापाल यांनी प्रमाणित केलेले)
**सरासरी रु.15,00,000/-(रक्कम रुपये पंधरा लाख) पेक्षा अधिक असणे आवश्यक आहे.**

**निविदाधारकाचे / संस्थेचेनाव :-..........................................................................................**

| आर्थिकवर्ष | वार्षिक उलाढाल रक्कम रुपये (लाखात) |
|---|---|
| सन 2022-23 | |
| सन 2023-24 | |
| सन 2024-25 | |
| एकुण बेरीज | |

**सनदी लेखापाल यांची स्वाक्षरी व शिक्का**

Scanned with OKEN Scanner

प्रपत्र –2

आयकर रिटर्न (ITR)

| आर्थिकवर्ष | संस्थेची कर पात्र भरणा केलेली रक्कम रुपये |
|---|---|
| सन 2022-23 | |
| सन 2023-24 | |
| सन 2024-25 | |

दिनांक: -

स्थळ: -

निविदा धारकाचे नाव, स्वाक्षरी व शिक्का

Scanned with OKEN Scanner

प्रपत्र – 3

## संस्थेकडे प्रस्तूत वस्तू मागणीनुसार पुरवठा करण्यासाठी उपलब्ध असल्याबद्दलची मनुष्यबळाची माहीती किंवा अन्य मार्गाने मनुष्यबळ उपलब्ध करुन देण्याची व्यवस्थाबाबत माहिती

| अ. क्रं. | सदयस्थितीत उपलब्ध मनुष्यबळाची संख्या | अन्य मार्गाने मनुष्यबळ, संच उपलब्ध करुन देण्याची व्यवस्थाबाबत माहिती |
|---|---|---|
| | | |

दिनांक:

स्थळ:

निविदाधारकाचे नाव, स्वा

Signature Not Verified
Digitally signed by SUHASINI NAGESH GONEWAR
Date: 2026.02.10 13:55:04 IST
Location: Maharashtra-MH

Scanned with OKEN Scanner